दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com



सर्वोच्च न्यायालयाची अजब निर्णयाची गजब कहानी..
पान २

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२२ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## कोकणी माणसासाठी फडणवीस सरकारची मोठी घोषणा




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, मुंबई :** शिमगोत्सवासाठी कोकणात आपापल्या गावी जाणाऱ्या मुंबईतील कोकणकरांसाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. फडणवीस सरकारने शिमग्याआधी कोकणी माणसासाठी खुप मोठी घोषणा केली आहे. आता शिमग्याला कोकणात बोटीने जाता येणार आहे. येत्या १ मार्चपासून समुद्री मार्गे तळकोकणात जाता येणार आहे. या संदर्भात एम टू एम फेरीचं नियोजन करण्यात आलं असून या प्रवासाचं वेळापत्रकही जाहीर करण्यात येणार आहे. मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी या संदर्भात घोषणा देत वेळापत्रकाची घोषणा देखील केली आहे. त्यामुळे शिमग्याला कोकणात जाणाऱ्या कोकणी माणसाला काहीसा दिलासा मिळाला असून हा प्रवास अधिक सुखकर आणि सोयीचा होईल असा दावा सरकारकडून करण्यात आला आहे.

भाऊचा धक्का ते विजयदुर्ग फेरीस १ मार्चपासून सुरुवात होईल अशी माहिती मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिलीय. या संदर्भात वेळापत्रकाची घोषणा देखील केली आहे. तर मंत्री नितेश राणेही पहिल्या दिवशी बोटीने प्रवास करणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे मुंबईतून अवघ्या ७ तासात विजयदुर्ग गाठता येणार आहे. त्यामुळे कोकणी माणसाच्या वेळेचीही बचत होणार आहे.

● **दरम्यान या फेरी शेड्युलचे वेळापत्रक पुढील प्रमाणे असेल...**

– १ मार्च – भाऊचा धक्का येथून सकाळी ८ वाजता फेरी सुटेल, ती विजयदुर्ग येथे दुपारी ३ वाजता पोहोचेल.

– २ मार्च – विजयदुर्ग येथून दुपारी १२ वाजता फेरी सुटेल, ती सायंकाळी ७ वाजता भाऊचा धक्का येथे पोहोचेल.

– ३ मार्च – भाऊचा धक्का येथून सकाळी ८ वाजता फेरी सुटेल, ती विजयदुर्ग येथे दुपारी ३ वाजता पोहोचेल.

– ५ मार्च – विजयदुर्ग येथून दुपारी १२ वाजता फेरी सुटेल, ती सायंकाळी ७ वाजता भाऊचा धक्का येथे पोहोचेल.

– ७ मार्च – भाऊचा धक्का येथून सकाळी ८ वाजता फेरी सुटेल, ती विजयदुर्ग येथे दुपारी ३ वाजता पोहोचेल.

– ८ मार्च– विजयदुर्ग येथून दुपारी १२ वाजता फेरी सुटेल, ती सायंकाळी ७ वाजता भाऊचा धक्का येथे पोहोचेल.

# मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींना दिलासा !

## सरपंचच पाहणार प्रशासकीय कारभार...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत ज्यांची मुदत संपत आहे, त्या ग्रामपंचायतींमध्ये विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासक नेमणुकीवरील अनिश्चितता अखेर दूर झाली आहे.

जानेवारीमध्ये काढलेल्या परिपत्रकानुसार २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर बाहेरील प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. मात्र राज्यभरातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि पंचायत समित्यांमधील विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता प्रशासनासमोर व्यवहार्य अडचणी उभ्या राहण्याची शक्यता होती. यामुळे सरकारने सुधारित निर्णय घेत स्थानिक पातळीवरच कारभार सोपवण्याचा मार्ग निवडला.

नव्या आदेशानुसार, ग्रामपंचायतीची मुदत संपण्याच्या दिवशी जे सरपंच पदावर असतील, त्यांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले जाईल. त्यांच्या मदतीसाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनात सातत्य राहील आणि निर्णय प्रक्रियेत खंड पडणार नाही. प्रशासक आणि समितीचा कार्यकाळ नेमणुकीपासून सहा महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक पूर्ण होईपर्यंत इतकाच असेल. निवडणुका पार पडताच नव्याने निवडून आलेले पदाधिकारी नियमित कारभार स्वीकारतील.

सरकारने स्पष्ट केले आहे की, हा निर्णय सध्या २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच लागू



असेल. प्रशासक आणि समीती नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे असतील. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासन सुरळीत ठेवण्यासाठी आणि अचानक बदलामुळे निर्माण होणारी पोकळी टाळण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

## तुळजापूर तीर्थक्षेत्राचा कायापालट होणार...



## स्वप्नपूर्तीच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल : आ.राणाजगजितसिंह पाटील

**अक्षराज, विश्वास नायगांवकर**

**दि.२१, तुळजापूर (धाराशिव) :** कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी जगभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना आता जागतिक दर्जाच्या सुविधा मिळणार आहेत. तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत ४३८ कोटी ६९ लाख रुपयांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. हा प्रकल्प म्हणजे तुळजापूरला जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र बनवण्याच्या दिशेने पडलेले एक भक्कम पाऊल आहे. हा निर्णय म्हणजे स्वप्नपूर्तीच्या दिशेने पडलेले आणखी एक महत्वपूर्ण पाऊल असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

महायुती सरकारने तुळजापूरच्या विकासासाठी एकूण १८६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यानुसार या निविदेतील कामात प्रामुख्याने भाविकांच्या मूलभूत गरजा आणि आधुनिक सोयीसुविधांवर भर देण्यात आला आहे. हुडको एसटी स्टँड, आराधवाडी आणि घाटशीळ परिसरात मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात येणार आहेत. यामध्ये अत्याधुनिक भाविक सुविधा केंद्र, भव्य भक्त निवास, व्यावसायिक संकुल, मल्टीपर्पज हॉल आणि सुसज्ज पार्किंग व्यवस्थेचा समावेश असणार आहे.

ही सर्व कामे पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, इच्छुक कंत्राटदारांना २ मार्च २०२६ पर्यंत निविदा सादर करता येणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले केले आहे. हा विकास आराखडा राबवताना स्थानिक नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेण्यात आले आहे. भूसंपादनासाठी प्रचलित दरापेक्षा कितीतरी पटीने अधिक मोबदला दिला जाणार असून, एकूण निधीतील ३०% रक्कम केवळ भूसंपादनासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे केवळ पर्यटनालाच नव्हे, तर स्थानिक तरुणांना शाश्वत रोजगार मिळण्यासही मोठी मदत होणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नमूद केले आहे.

**पुढील दोन वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दीष्ट : आमदार पाटील**

येणाऱ्या काळात तुळजापूरच्या वैभवात भर टाकणारे काही विशेष प्रकल्प साकारले जाणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना देवी आशीर्वाद देत असतानाचे भव्य १०८ फूट उंचीचे शिवभवानी शिल्प, रामदरा तलाव परिसरात भव्य उद्यान, साऊंड अँड लाईट शो आणि वॉटरफ्रंटची कामे हाती घेण्यात येणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखाली तुळजापूरचा कायापालट करण्याचे आपण पाहिलेले स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत आहे. मार्च २०२८ पर्यंत हा संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना दर १५ दिवसांनी या कामाचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, प्रशासकीय स्तरावरही या कामाला आता मोठी गती मिळाली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

## मोताळा तालुक्यातील ५२ ग्रामपंचायतींसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलडाणा :** मोताळा तालुक्यातील ज्या ५२ ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपत आहे, त्यांच्यासाठी प्रशासनाने प्रभाग रचना कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर केला आहे.

✻ नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार, मोताळा यांनी केले आहे.

**▶प्रभाग रचनेचे प्रमुख टप्पे...**

– २० फेब्रुवारी २०२६ – त्रेस्रश्श एरऔंह नकाशे सुपरइम्पोज करून गावनिहाय नकाशे अंतिम

– २७ फेब्रुवारी २०२६ – तलाठी व ग्रामसेवक यांच्यामार्फत संयुक्त स्थळ पाहणी

– ५ मार्च २०२६ – समितीकडून प्रारूप तपासणी

– ११ ते २३ मार्च २०२६ – जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव व राज्य निवडणूक आयोगाची मान्यता

– ३० मार्च २०२६ – दुरुस्त्यांसह प्रारूप मान्यता

**नागरिकांसाठी हरकती / सूचना**

- ७ एप्रिल २०२६ – नमुना-ब मध्ये प्रारूप प्रसिद्धी
- १३ एप्रिल २०२६ – हरकती / सूचना सादर करण्याची अंतिम मुदत
- २१ एप्रिल २०२६ – हरकतींवर सुनावणी पूर्ण
- २८ एप्रिल २०२६ – अंतिम प्रभाग रचना निश्चिती
- ४ मे २०२६ – नमुना-अ मध्ये अधिकृत प्रसिद्धी

**समाविष्ट प्रमुख गावे (उदा.) :** आडविहीर, वरुड, शेलापूर, घुस्सर बु., माकोडी, उन्हा, आव्हा, टॅभी, टाकळी घडेकर, तळणी, दाभाडी, सावरगाव जहाँगीर, कोल्ही, पोफळी, सारोळा मारोती, काबरखेड, वडगाव खं., धामणगाव बढ़े, सिंदखेड, रिधोरा, पिंपळगाव देवी, रोहिणखेड, कोथळी, जयपूर, बोराखेडी, परडा, तरोडा, अंत्री, मुर्ती, पान्हेरा, किन्होळा, तपोवन, दाभा, उबाळखेड, खामखेड, मोहेगाव इत्यादी.

**महत्त्वाचे आवाहन :**

ग्रामस्तरावरील सूचना फलक व स्थानिक प्रसिद्धी माध्यमांतून माहिती उपलब्ध होईल.

नागरिकांनी नकाशे व प्रभाग सीमांची पाहणी करून, हरकती असल्यास त्या विहित मुदतीत सादर कराव्यात.

## बल्लारपुर तहसील कार्यालयात २४ फेब्रुवारीला जनता दरबार, जिल्हाधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, बल्लारपूर (चंद्रपूर) :** शासनाच्या विविध योजना व धोरणांची प्रभावी अंमलबजावणी तसेच नागरिकांच्या तक्रारी व समस्यांचे वेळेत निराकरण करण्याच्या उद्देशाने तहसील कार्यालय, बल्लारपूर येथे २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. हा जनता दरबार दुपारी १२.३० ते १.०० या वेळेत आयोजित करण्यात येणार असून कार्यक्रमास विनय गौडा जी. सी., जिल्हाधिकारी




चंद्रपूर, यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत. यावेळी ते उपस्थित नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या तक्रारी व समस्या जाणून घेणार आहेत.

नागरिकांनी आपल्या तक्रारी व समस्यां संदर्भातील आवश्यक कागदपत्रे व माहिती सोबत घेऊन जनता दरबारात उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार रेणुका कोकाटे बल्लारपूर यांनी केले आहे. तसेच बल्लारपूर तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांनीही आवश्यक माहितीसह जनता दरबारास अनिवार्यपणे उपस्थित राहावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# खेळाडू घडविण्यासाठी भांडा



खेळ व क्रीडा प्रकारांचे महत्त्व सारे जग जाणू लागले आहे. क्रीडा क्षेत्राला अधिकाधिक पुढे आणण्यासाठी जगभरातील देश पुढे सरसावले आहेत. तुलनेत भारतात उशिरा का होईना क्रीडा क्षेत्राला उर्जितावस्था देण्याचा प्रयत्न होतोय. क्रिकेटमध्ये भारताने जगात आपली चांगलीच मोहोर उमटवली आहे. 'आयपीएल'सारख्या स्पर्धांमुळे त्यात भर पडली. देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रतिभावंत क्रिकेटपटूंना संधी मिळत आहे.

महाराष्ट्रात राज्य पातळीवरील क्रिकेट संघटना, जिल्हा क्रिकेट संघटना, विविध ठिकाणी माजी खेळाडूंनी सुरू केलेले क्लब, अकादमी आदींच्या माध्यमातून अनेकविध सुविधा खेळाडूंना उपलब्ध करून दिल्या जात आहेत. काही जिल्हा क्रिकेट संघटना आंतरराष्ट्रीय स्तराच्या सुविधा देत आहेत. त्यांचे खेळाडू राष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करत आहेत, त्यांचे करिअर घडत आहे. क्रीडा शिक्षक, प्रशिक्षकांना संधी मिळत आहेत.

अशी स्थिती एकीकडे असताना दुसरीकडे छत्रपती संभाजीनगरमधील जिल्हा क्रिकेट संघटना दुसऱ्याच दिशेने जाताना दिसते. या संघटनेतील राजकारण विकोपाला गेले आहे. आपसातील वाद, राजकारण यामुळे जिल्ह्यातून तयार होणाऱ्या क्रिकेटपटूंना वाव मिळणे कठीण झाले आहे. गेल्या १५ वर्षांपासून संघटनेत वाद सुरू आहे. त्यावेळच्या निवडणुकीत ४८ सदस्यांवर आक्षेप घेतला गेला होता. कार्यकारिणी निवडीला कायम वादाची किनार राहिली. त्रयस्थ अधिकाऱ्यामार्फत स्वतंत्र चर्चा करून वाद मिटविण्याचा प्रयत्न झाला; पण त्यास यश आले नाही. सध्या अस्तित्वात असलेली कार्यकारिणी नियमित नसल्याचे सांगितले जाते. अनेक वर्षे चर्चेचे सुरू असलेले गुऱ्हाळ आता पुन्हा सुरू झाले आहे. त्याला भविष्यातील राज्यस्तरीय क्रिकेट विश्वातील घडामोडींचा संदर्भ दिला जातो. त्यात तथ्य आहे की नाही, हे काळच सांगेल. पण जिल्हा क्रिकेट संघटनेच्या सततच्या वादांमुळे उदयोन्मुख खेळाडूंना मात्र फटका बसत आहे.

क्रिकेटचे माहीतगार, क्रिकेट खेळलेले सदस्य संघटनेत असणे संघटनेची सक्षमता वाढवते. पण त्यावर निवडून येण्यासाठी नातेवाईक, मित्र परिवार, आप्तेष्टांचा केलेला भरणा उघडकीस आल्यामुळे वादाला सुरुवात झाली होती. ती कुठेतरी थांबली पाहिजे. पद, खुर्चीसाठी आपसांत भांडण्याऐवजी खेळाडू घडविण्यासाठी, त्यांना राज्य पातळीवर संधी कशी मिळेल यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी भांडले पाहिजे. संघटनेचे स्वत:चे मैदान आहे. तिथे सद्यस्थितीत काही सुविधा उपलब्ध आहेत, काही करून दिल्या जात आहे. जिल्हा पातळीवरील स्पर्धांव्यतिरिक्त महाराष्ट्र क्रिकेट संघटना, बीसीसीआयचे काही सामने या ठिकाणी होतात, ही चांगली गोष्ट आहे. मात्र या मैदानाचा लाभ किती स्थानिक खेळाडूंना मिळाला, याचे उत्तरही संघटनेशी संबंधित सर्वांकडून येणे अपेक्षित आहे. केवळ 'आम्ही हे केले आणि आम्ही असतो तर हे केले असते' या हवेतल्या गप्पांना काही अर्थ नाही.

छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा क्रिकेट संघटनेने पुढाकार घेऊन अधिकाधिक चांगले खेळाडू घडावेत, त्यांना विभाग, राज्य, देशपातळीवर तसेच आयपीएलसारख्या स्पर्धांमध्ये संधी मिळावी, यासाठी पुढाकार घेणे निकडीचे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रशासकीय पातळीवरून संघटनेच्या बाबतीत तत्काळ निर्णय घेऊन सदस्य नावनोंदणी, तपासणी, त्रुटी दूर करणे, निवडणूक प्रक्रिया राबविणे याकडे लक्ष दिले पाहिजे. संघटनेत क्रिकेटशी संबंधितच सदस्य असावेत, यासाठी काय धोरण ठरविता येईल, हे पाहिले पाहिजे. वर्षानुवर्षे रेंगाळलेला हा प्रश्न मार्गी लागला तर जिल्हा, विभागातील भावी क्रिकेटपटूंसाठी पर्वणी ठरेल, यात शंका नाही. या दृष्टीने ठोस पावले टाकली गेली तरच खेळाचे राजकारण टाळता येईल, गुणवंत खेळाडूंना संधी मिळेल. किमान यापुढे तरी संघटनेच 'स्वच्छता मोहीम' राबवली जाणार काय, हा खरा प्रश्न आहे.

# मौलाना अबुल कलाम आझाद !


श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

आज २२ फेब्रुवारी, देशाचे पहिले शिक्षणमंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांची पुण्यतिथी. ११ नोव्हेंबर १८८८ रोजी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. त्यांचा जन्मदिन संपूर्ण भारतात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले.

त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत.

मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण



करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही.

१५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते.

ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २२ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले.

**पुण्यतिथी दिनी त्यांच्या**
**पवित्र स्मृतीस**
**विनम्र अभिवादन!**

# सर्वोच्च न्यायालयाची अजब निर्णयाची गजब कहानी



**रविवार विशेष..**

....मोफत जेवण मिळाल्यावर लोक काम करतील का?' हा प्रश्न जर चहाच्या टपरीवर कोणी विचारला असता तर त्यावर दोन मिनिटांत गप्पा रंगल्या असत्या, चार उदाहरणं दिली गेली असती आणि शेवटी 'अरे, सगळं राजकारण आहे' म्हणून विषय मिटला असता. पण हा प्रश्न जेव्हा देशाच्या सर्वोच्च न्यायालयातून आला, तेव्हा तो आपल्या धोरणांना, सवयींना आणि मानसिकतेला आरसा दाखवणारा ठरला. सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी तामिळनाडू सरकारला सुनावणीदरम्यान विचारलेल्या या प्रश्नाने अनेक प्रतिप्रश्नही उपस्थित केले आहेत. कल्याणकारी योजना आणि 'फुकट संस्कृती' यामधील रेषा नेमकी कुठे आखायची? गरजूंना आधार देणे आणि सर्वांना मोफत देत राहणे यात फरक आहे की नाही? आणि तो असेल तर तो कोण ठरवणार? न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, गरिबांना मदत करणे समजण्यासारखे आहे. पण जो पैसे भरू शकतो आणि जो भरू शकत नाही, यांच्यात कोणताही फरक न करता सर्वांना मोफत सुविधा देणे योग्य नाही. राज्ये महसुली तुटीत असताना विकासाऐवजी मोफत सुविधा देण्यात गुंतली आहेत, असे निरीक्षणही नोंदवले गेले.

ग्रामीण भागात म्हण आहे, 'फुकटचं मिळं अन् गटकन गिळं.' एखाद्या गावात जत्रेत लाडू वाटले तर लोक दोनदा रांगेत उभे राहतात. पण त्याच गावात स्वच्छतागृह बांधायला सांगितले तर 'उद्या पाहू' अशी भूमिका घेतात. ही केवळ ग्रामीण मानसिकता नाही, ती राष्ट्रीय प्रवृत्ती झाली आहे. विविध राज्यांतील योजना पाहिल्या तर चित्र आणखी गडद होते. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेत महिलांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते. मध्य प्रदेशातही तत्सम योजना आहे. तामिळनाडूमध्ये महिलांना मासिक आर्थिक सहाय्य दिले जाते. दिल्लीमध्ये महिलांना मोफत बस प्रवास आणि नागरिकांना ठरावीक प्रमाणात पाणी मोफत दिले जाते. छत्तीसगडमध्ये गॅस सिलेंडरवर अनुदान, हरियाणात महिलांना आर्थिक मदत अशी यादी लांबतच जाते. या सर्व योजनांना सामाजिक न्याय, सक्षमीकरण, महिलांना आधार, गरिबांना दिलासा अशी लेबले लावली जातात. याला काही अपवाद आहेत. खरोखरच समाजात विषमता आहे. अनेकांना दोन वेळचे जेवण मिळणे कठीण आहे. पण प्रश्न पडतो की, आपण गरजूंना या माध्यमातून मदत करतो की सर्वांना समान रीतीने मदत केल्याचे नाटक करतो ?

राजकारणाची गणिते साधी असतात. मतदारांची संख्या जितकी मोठी, तितका मतांचा पाऊस जोरात पडतो. मोफत योजना ही मतांच्या ढगांना पावसात बदलणारी जादूची कांडी बनते. निवडणुकीआधी घोषणा होते, प्रचारसभेत टाळ्यांचा कडकडाट होतो आणि निकालानंतर अर्थसंकल्पात आकडेमोडीची कसरत सुरू होते. महसुली तुटीचा आकडा वाढतो, पण घोषणांच्या पोस्टर्सवरील हसणारे चेहरे मात्र कमी होत नाहीत. असे असले तरी, न्यायालयाने उपस्थित केलेला मुद्दा कार्यसंस्कृतीचा आहे. जर मूलभूत गरजा राज्य पूर्ण करणार असेल, तर व्यक्तीने काम का करावे? हा प्रश्न थोडा अतिशयोक्तीचा वाटू शकतो. कोणालाही केवळ मोफत वीज किंवा पाण्यावर आयुष्य काढता येत नाही. पण मानसिकतेत तर बदल होतो. 'काहीतरी मिळेलच' ही भावना कार्यक्षमतेवर निश्चितच परिणाम करणारी ठरू शकते. आपण कल्याणकारी राज्य आहोत, हे आपण वारंवार म्हणतो. पण कल्याणकारी राज्य म्हणजे प्रत्येकाला सर्व काही मोफत देणे नव्हे. कल्याणकारी राज्य म्हणजे ज्यांना गरज आहे त्यांना संधी देणे, शिक्षण, आरोग्य, रोजगाराची साधने उपलब्ध करून देणे, म्हणजे व्यक्ती स्वावलंबी होईल. मोफत संस्कृती मात्र स्वावलंबनाऐवजी अवलंबित्व वाढवते. अर्थात मोफतच्या योजना जाहीर करताना त्यांना कोणीही मोफत म्हणत नाही. त्या 'ऐतिहासिक निर्णय' असतात. ते एक 'क्रांतिकारी पाऊल' असते. त्यात 'गरिबांचा विजय' असतो. पण त्याच योजना जेव्हा अर्थसंकल्पाचा तोल बिघडवतात, तेव्हा त्या अचानक 'आर्थिक बोजा' बनतात. न्यायालयाने म्हटले की, विजेचे बिल भरू न शकणाऱ्यांना मदत करा, पण सक्षम आणि असमर्थ यांच्यात फरक करा. हा फरक करणे प्रशासनासाठी कठीण असते. त्यासाठी माहिती, पडताळणी, निकष लागतात आणि त्यात राजकीय धोका असतो. सर्वांना मोफत देणे सोपे, निवडकांना देणे अवघड. कारण निवडकतेत नाराजीचा धोका असतो. लोकांनीही विचार करायला हवा, आपण मतदान करताना रोजगार, उद्योग, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य यावर चर्चा करतो का? अनेकांचा 'काय मिळणार?' हा पहिला प्रश्न असतो.

जर मतदारांनीच अपेक्षा बदलल्या नाहीत, तर राजकारणात बदलाची अपेक्षा तरी कशी करणार? फुकट मिळालेल्या वस्तूंचा आनंद क्षणिक असतो, पण टिकाऊ प्रगतीसाठी मेहनत, धोरणात्मक गुंतवणूक आणि संयम लागतो. यात दुसरी बाजूही आहे. अनेकदा सरकारे म्हणतात की मोफत सुविधा या सामाजिक गुंतवणूक आहेत. उदाहरणार्थ, महिलांना आर्थिक मदत दिल्यास त्यांची कुटुंबातील निर्णयक्षमता वाढते, मुलांच्या शिक्षणावर खर्च वाढतो, पोषण सुधारते. या दाव्यांमध्ये तथ्य असू शकते. त्यामुळे सर्व मोफत योजना वाईटच, असेही म्हणता येत नाही. मूळ प्रश्न आहे तो संतुलनाचा. न्यायालयाचा सवाल हा केवळ सरकारला नाही, तर समाजालाही आहे. आपण कोणती संस्कृती विकसित करतो आहोत? मेहनतीची की अपेक्षांची ? स्वावलंबनाची की सवलतींची? 'फुकटचं मिळं अन् गटकन गिळं' ही म्हण आपण विनोदाने वापरतो, पण तीच जर धोरणाचा पाया बनली तर....?

**- ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो. मासा बेलेवाडी**
**कागल -कोल्हापूर**

## फाईल

मंत्रालयातफाईली
पडतात धूळ खात
कागदपत्रे सु योग्य
कुणी ना लावे हात

विनंत्या रात्रं दिवस
कैकदा जोडले हात
बदलून टाकले चित्र
जरा ओले करे हात

जे जे होते विरोधात
आतादेऊ लागेसाथ
सटासट हले फाईल
जादू होई अकस्मात

सह्याही अर्ध्या रात्री
शिक्केबसे एकजात
क्लीअर करे फाईल
लाचखोर जन्मजात

होत्याचे नव्हते केले
क्षणार्धात वाता हात
माहीत न स्कॅममध्ये
कुणाचे गुंतलेत हात

सामान्य मात्र बिचारे
ते फसवले हातोहात
कसे कळे मिडियास
कुणी केला बा घात

सोयरेसुतक न कुणा
तिकडे होई घातपात
संधी निसटे हातातून
दाखवी चांगला हात

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## यल्लमा देवीच्या मुकुट चोरीचा उलगडा; आरोपी जेरबंद




**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२०, येरवडा (पुणे) :** येरवडा परिसरात यल्लमा देवी मंदिरातील चांदीचा मुकुट चोरीला गेल्याची घटना उघडकीस आल्यानंतर लक्ष्मीनगर पोलीस स्टेशनने तात्काळ तपास सुरू करून अवघ्या काही तासांत आरोपीला अटक करत धडाकेबाज कामगिरी केली आहे. दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी यल्लमा देवीचा सुमारे ७०० ग्रॅम वजनाचा, अंदाजे १ लाख ८४ हजार रुपये किंमतीचा चांदीचा मुकुट चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाची सूत्रे हाती घेतली.

घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतानाही पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणासह परिसरातील इतर सीसीटीव्हींचा आधार घेत तपास पुढे नेला. या तपासातून सुरक्षानगर परिसरातील शिवराम पापा काळे (वय ४७) याच्यावर संशय बळावला. पोलिसांनी सापळा रचून त्याचा पाठलाग करत त्याला शिताफीने ताब्यात घेतले.

आरोपीकडून कसून चौकशी केल्यानंतर त्याच्याकडून चोरीस गेलेला यल्लमा देवीचा चांदीचा मुकुट जप्त करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान कोणत्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची पोलिसांनी विशेष काळजी घेतली.

सदर कारवाई पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनिकांत आणि सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापुरकर लक्ष्मीनगर पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र कदम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली.

## खापरखेडा वीज केंद्रात शिवजयंती साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातील कोळसा हाताळणी विभागात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी शिवरायांच्या प्रतिमेची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व द्वीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपमुख्य अभियंता नारायण राठोड, अधीक्षक अभियंता प्रवीण रोकडे, कार्यकारी अभियंता सुजय चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मंगेश फटिंग, उपकार्यकारी अभियंता किशोर बाळापूरे व तेजस टुबरीकर तसेच सहाय्यक अभियंता चेतन चव्हाण यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्य, दूरदृष्टी, नेतृत्वगुण व स्वराज्य स्थापनेतील योगदानाबद्दल माहिती दिली. शिवरायांच्या आदर्शांचे पालन करून प्रामाणिकपणे व कर्तव्यनिष्ठेने काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यक्रमामुळे विभागात देशभक्तीचे व प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले.

## मुदखेड तलाठी संघाच्या तालुका अध्यक्षपदी बोदमवाड तर सचिव पदी गोपाल माने यांची निवड

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२१, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील तहसील कार्यालयात तलाठी संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष बाबुराव मुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी संघटना तलाठी संघाच्या अध्यक्षपदी वासरी सज्जाचे तलाठी विश्वनाथ बोदमवाड यांची तर सचिव पदी मुदखेडचे तलाठी गोपाल माने यांची सर्व तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या संमतीने सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून शंकर वच्छेवार यांची तर कोषाध्यक्ष म्हणून राजू चव्हाण यांची निवड सर्वानुमते करण्यात आली आहे.

संघटनेच्या नूतन सर्व पदाधिकाऱ्यांचे तहसीलदार आनंद देऊळगावकर नायब तहसीलदार मारोतराव जगताप, संतोष कामटेकर, पाटे, मंडळ अधिकारी रूपाली जडे, अंजली बार्शीकर, शितल तरटे ग्राम महसूल अधिकारी मनोज वाघमारे,विकास गलांडे, शेषेराव कोटुलवार, गंगाधर मोरे, प्रसाद पांडे, युसुफ शेख, सविता कल्याणकर, रंजना दमकोंडवार यांच्यासह तहसील कार्यालयातील सर्व महसूल अधिकारी कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## आता मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीत सरपंच राहणार प्रशासक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यात १७ ग्रामपंचायतपैकी १२ ग्राम पंचायतीची मुदत नुकतीच संपली. यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकांच्या हाती जाणार होता. तशी प्रशासकीय पातळीवर प्रशासक नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. अशातच ग्रामविकास विभागाने राजपत्र काढून विद्यमान सरपंचांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीत सरपंच हेच प्रशासक म्हणून कारभार सांभाळणार आहे. त्याचप्रमाणे उपसरपंच यांच्यासह निवडक सदस्यांची कामकाज समिती गठीत करण्याचे निर्देशीत करण्यात येत आहे. यासंदर्भात २० फेब्रुवारी २०२६ रोजी अधिसूचना ग्रामविकास विभागाने काढली आहे. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर, नांदगाव ( पोडे ), हडस्ती, मानोरा, कळमना, पळसगाव, कोर्टीमक्ता, गिलबीली, आमडी, किन्ही येथील ग्रामपंचायतीची मुदत ४ फेब्रुवारी २०२६ रोजी मुदत संपली होती. त्याचप्रमाणे लावारी व दहेली या ग्रामपंचायतीची मुदत ६ आगस्ट २०२४ रोजी संपुष्टात आली. या सर्व १२ ग्रामपंचायतीची मुदत संपली असून प्रशासकीय राजवट आणण्याची तयारी प्रशासनाने केली होती. काही ठिकाणी प्रशासकाची नेमणूक देखील केली.

मात्र, आता ग्रामविकास विभागाच्या अधिसूचना काढून विद्यमान सरपंचांना मोठा दिलासा दिला आहे. त्याचप्रमाणे प्रशासकीय कामकाज चालविण्यासाठी त्या त्या ग्राम पंचायतीचे उपसरपंच व काही सदस्यांची समिती गठीत करण्याचे निर्देश दिले आहे. यामुळे सरपंच व उपसरपंच यांना किमान सहा महिन्यासाठी प्रशासक म्हणून कारभार करण्याची संधी मिळाली आहे.

## नगर-मनमाड रस्त्यावर धुळीचे साम्राज्य; राहुरी खुर्दमधील व्यापारी व नागरिक त्रस्त



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२१, राहुरी :** अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील सुरू असलेल्या दुरुस्ती व रुंदीकरणाच्या कामामुळे राहुरी शहरासह राहुरी खुर्द गावात मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्त्याच्या कामासाठी करण्यात येणारे खोदकाम, टाकण्यात येणारी माती व खडी तसेच जड वाहनांची सततची ये-जा यामुळे दिवसभर धुळीचे लोट उडत आहेत.

विशेषतः राहुरी खुर्द गावातील व्यापारी तसेच नागरिक या धुळीमुळे त्रस्त झाले आहेत. दुकानदारांच्या दुकानात धूळ साचत असून मालाची नासधूस होत आहे. ग्राहकांची ये-जा कमी झाल्याने व्यापारावर परिणाम होत असल्याची खंत व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. धुळीमुळे नागरिकांना श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ, ॲलर्जी यांसारख्या तक्रारी वाढल्या आहेत.

महामार्गावरून मोठ्या प्रमाणावर जड वाहनांची वाहतूक होत असल्याने धुळीचे प्रमाण अधिक वाढत आहे. काही ठिकाणी पाणी फवारणी अपुरी पडत असल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. अपूर्ण काम, खड्डे व सैल मातीमुळे दुचाकीस्वारांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.

शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व महिलांना या परिस्थितीचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे. राहुरी खुर्द ग्रामस्थांनी संबंधित विभागाने तातडीने नियमित पाणी शिंपडणी करावी, धूळ नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात व रस्त्याचे काम लवकर पूर्ण करावे, अशी मागणी केली आहे. विकासकामांसोबत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## माझी वसुंधरा अभियानात महाबळेश्वर नगरपरिषदेचा गौरव

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२१, महाबळेश्वर :** पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०' (कालावधी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४) आणि '५.०' (कालावधी १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५)चा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा वरळी येथील छडउख डोम येथे अत्यंत उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल आचार्य देवव्रत उपमुख्यमंत्री(राज्य उत्पादन शुल्क) सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यस्तरावर १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या गटात महाबळेश्वर

*** माझी वसुंधरा ४.० आणि ५.०: या टप्प्यात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून पर्यावरणाचे संतुलन राखणाऱ्या शहरांचा आणि गावांचा सन्मान करण्यात आला. घनकचरा व्यवस्थापन, वृक्षारोपण आणि जलसंधारणात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्थांना पुरस्कृत करण्यात आले.**

गिरिस्थान नगरपरिषदेचा माझी वसुंधरा ४ व ५ मध्ये सलग २ क्रमांक व भूमी घटका मध्ये प्रथम मानांकन असे एकूण तीन मानांकन मिळालेबद्दल महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या शुभहस्ते महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुनिल शिंदे, मुख्याधिकारी योगेश पाटील, विभागप्रमुख प्रदीप




बोरगे, कल्याण हिवरे व वैभव साळुंखे यांनी पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी व्यासपीठावर राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, आणि माझी वसुंधरा अभियानाचे संचालक सुधाकर बोबडे यांनी या सोहळ्याचे नेटके नियोजन केले.

निसर्गाच्या पंचमहाभूतांचे जतन करण्याचा संदेश देत, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला.

## सार्वजनिक उत्सव समिती शिळ, देसाई दहिसर विभागाकडून शिवजयंती साजरी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, शिळफाटा (ठाणे) :** शिवजयंती उत्सव समितीने आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती रथामध्ये बसवण्यात आली. मूर्तीची पूजा अर्चना करण्यात आली त्या नंतर महाआरती करण्यात आली. दत्तमंदिर कल्याण फाटा येथून सुरू झालेल्या बाईक रॅलीने शहरभर धुमाकूळ घातला.

या कार्यक्रमात माजी आ.सुभाष भोईर, नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेवक भरत पाटील, नगरसेविका वेदिका पाटील, नगरसेविका अर्चना पाटील, नगरसेविका प्रतीक्षा पाटील, माजी नगरसेवक हिरा पाटील, भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष कल्याण लक्ष्मण पाटील, शिळ-डायघर वरिष्ठ निरीक्षक श्रीराम पोळ, समाजसेवक सुमित भोईर,शिळ दिवा युवा मोर्चा अध्यक्ष साहिल पाटील,शिवसेना युवा सेना दिवा शहर उपाध्यक्ष वैभव आलिमकर, महेश पाटील, शरद पाटील, संतोष पाटील, बाबुराव मुंडे, रवींद्र पाटील, गिरीश पाटील, प्रवीण पावशे, योगेश पाटील,महिंद्र आलिमकर, निलेश पाटील, शशिकांत पाटील, नामदेव पाटील, हरिचंद्र दातिलकर, पत्रकार रमेश राऊत, ज्येष्ठ पत्रकार मंगल खारपाटील शिळ, देसाई दहिसर विभागातील सर्व हिंदू बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराजांना मानाचा मुजरा दिला. कार्यक्रमात मराठा तेतूका मेळवावा हिंदू धर्म: वाढवावा या घोषवाक्यासह शिव जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.



बाईक रॅली रेंजीचा मार्गे पडले - देसाई - खिडडकाळी - डायघरनाका - उत्तरशिव - भंडार्ली - मोकाशी पाडा - दहिसर मोरी - दहिसर पिंपरी - भोलेनाथ नगर - बायपास - फडके पाडा - खार्डी चौक - शिळ गांव या मार्गावरून गेली. ढोल ताशाचा गजर, मावळ्यांच्या डोक्यावर भगवे फेटे, हातात भगवे झेंडे, रस्त्यामध्ये भगवे पताका सुद्धा लावण्यात आल्या होत्या. सर्व परिसर भगवे झाले होते. श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव, जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा कानावर एकालाही मिळत होत्या. लहान मुलांनी पारंपारिक वेशभूषा सुद्धा केली होती. गुरुकुल इंग्लिश हायस्कूल, हाशा रामा पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम सादर केली. समारोप श्री गणेश मंदिर जवळ, शिळफाटा सर्कल येथे करण्यात आले. आलेल्या मान्यवरांचे सत्कार सुद्धा करण्यात आले. महिंद्र आलिमकर यांनी स्नेह भोजनाची सोय केली होती. सर्व शिवप्रेमींनी महाप्रसादाचा लाभ घेतला त्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाने शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि शौर्याचा जागर केला आणि हिंदू धर्माच्या एकतेचे प्रतीक बनला.

## शिवजयंतीनिमित्त खापरखेड्यात जनसेवेचा जागर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून खापरखेडा येथे भव्य शासकीय सेवा व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान राजे छत्रपती संभाजी महाराज चौक येथे पार पडलेल्या या उपक्रमात सुमारे ४ हजार नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घेत शिवजयंती उत्साहात साजरी केली. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी व मातृशक्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या नि:शुल्क शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नये या उद्देशाने या शिबिरात महत्त्वाच्या सेवा पुरवण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने आयुष्मान कार्ड व त्यासंबंधित समस्यांचे निवारण, आभा कार्ड व ABC आयडी कार्ड निर्मिती, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना केवायसी प्रक्रिया आदि सुविधा होत्या.





३ दिवसांच्या कालावधीत खापरखेडा व विविध गावातील हजारो नागरिकांनी सुविधांचा लाभ घेतला.

१९ फेब्रुवारी गुरुवारला शिवजयंतीच्या दिवशी नि:शुल्क आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २८० नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले. सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन माल्यार्पण व द्वीप प्रज्वलन करून मुख्य सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या इतिहासावर आणि त्यांच्या सुशासनावर विस्तृत प्रकाश टाकला.

शिबिर यशस्वी करण्यासाठी आयोजक किशोर खोरगडे, नरेश मोरे, मुकुल खोरगडे, शिवकुमार हरडे, छगन रंगडहाले, राजकुमार उके, रणजित सिंग, अमोल कळंबे, प्रवीण उंद्रे, नितीन इंगोले, कमलाकर खोडे यांनी विशेष पुढाकार घेतला.

तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शोभा चौरसिया, दिशा बिरखेडे, ज्योती वैष्णव, खुशबू ठाकूर, पूजा श्रीवास्तव, लता बसुले, कंचन कबीरे, पौर्णिमा बिजोले, सुनिता बांगरे, श्रावण वाघ, तरुण मित्तल, सार्थक इंगोले, रचित इंगोले आणि प्रवीण लाकडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले असून केवळ उत्सव न साजरा करता जनसामान्यांच्या अडीअडचणी सोडवून शिवजयंती साजरी करण्याचा हा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.

# पाटणमध्ये २८ फेब्रुवारी ते २ मार्च कालावधीत पाटण महोत्सव

## शेती, उद्योग आणि परिसरातील स्थानिक उत्पादनांचा भव्य संगम

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२१, पाटण (सातारा) :** पाटण येथे कोयना एजुकेशन सोसायटी पाटण, बा. दे.कॉलेज, पाटण (IQAC) आणि रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी, १ मार्च आणि २ मार्च या दिवशी पाटण महोत्सव साजरा होत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना शेती, उद्योग, नवउर्जा व स्थानिक उत्पादनांची प्रत्यक्ष माहिती मिळणार असून खरेदी-विक्रीसाठी एकाच ठिकाणी नवीन उधोजाकाना, विद्यार्थी यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची कोयना एजुकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर आणि संजीव चव्हान यांनी दिली.

यावेळी संयोजन समितीचे चेअरमन डॉ.विलासराव कळंत्रे , समन्वयक डॉ. हेमलता काटे , सदस्य रो. जगदीश शेंडे, सचिव विजय काटे सदस्य डॉ दीपक पाटील, डॉ. विनायक राउत, डॉ. संतोष पाटील,.डी डी थोरात, शिवहर आंबेगावे, अनिल पाटील विनायक माथने, सतीश गायकवाड उपस्थित होते .

या महोत्सवात भात, नाचणीसह विविध धान्यांचे प्रदर्शन आणि थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. सुधारित बियाणे, सेंद्रिय शेती, काढणी-पश्चात प्रक्रिया आणि बाजारपेठेतील संधींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनांची थेट विक्री करता येणार असल्याने मध्यस्थांचा खर्च कमी होऊन उत्पन्नवाढीचा मार्ग खुला होणार आहे.

आधुनिक शेती अवजारे, लघुउद्योगांतील नावीन्यपूर्ण उत्पादने आणि सौरऊर्जा उपाययोजना यांचे सादरीकरण येथे पाहायला मिळेल. खर्च कमी करून उत्पादन वाढविणारे पर्याय, सोलर पंप-पॅनल्ससारखी तंत्रे, तसेच ग्रामीण उद्योजकतेला चालना देणारी उत्पादने यामुळे शेतकरी व नवउद्योजकांना प्रत्यक्ष माहिती व व्यवहार्य पर्याय मिळणार आहेत.

महिला बचत गटांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती प्रक्रिया-उत्पादने, मसाले, पापड-लोणची यांसह विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री येथे होणार आहे. त्याचबरोबर स्थानिक चवीचे खाद्यपदार्थ नागरिकांना चाखायला मिळणार असून दर्जेदार स्थानिक उत्पादनांना थेट बाजारपेठ मिळेल.

पाटण महोत्सवचा उद्देश शेती-उद्योग-नवउर्जा-स्वयंरोजगार या सर्व घटकांना एकत्र जोडून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे हा आहे. माहिती, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा सेतू उभारून शेतकरी व उद्योजकांचे उत्पन्न वाढवणे, तसेच नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार स्थानिक उत्पादने उपलब्ध करून देणे हीच या महोत्सवाची खास ओळख ठरणार आहे. नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून प्रदर्शनाला भेट द्यावी, खरेदी-विक्रीत सहभागी व्हावे आणि या लोकाभिमुख उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## अतिक्रमण विभागाच्या वतीने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व कैलास गायकवाड, उप आयुक्त (अतिक्रमण) यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागात कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत ज्ञानेश्वर माऊली ओनर्स असोसिएशन, सेक्टर ०७, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील रहिवाश्याकडून दिनांक ११/०२/२०२६ रोजी ई विभाग कोपरखैरणे येथे तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने अतिक्रमण विभागामार्फत स्थळ पाहणी केली असता सेक्टर ०७, कोपरखैरणे येथील एस.एस. टाईप रूम नं ४६३ व एस.एस. टाईप रूम नं ४६५,मधील मोकळ्या भूखंडावर ५.५० मी द ६.६० मी एवढ्या क्षेत्रफळाचे पत्राशेड टाकून मंदिर बनविण्याचे काम चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सेक्टर ०७, कोपरखैरणे येथील एसएस टाईप रूम नं ४६३ व एसएस टाईप रूम नं ४६५, मधील मोकळ्या जागेतील मंदिराची मागील भिंत व पुढील भिंतीवर निष्कासनाची तोडक कार्यवाही करण्यात आली.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत ऊ धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/ कर्मचारी व नमुंमपा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी मजूर, इलेक्ट्रॉनिक हॅमर, व गॅस कटर चा वापर करण्यात आला. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# विंचूर 'एमआयडीसी'त घुमला शिवरायांचा जयघोष

## मॉर्निंग ग्रुपतर्फे आगळ्यावेगळ्या पद्धतीने शिवजयंती साजरी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** आरोग्य प्रति जागृत असलेल्या विंचूर येथील 'मॉर्निंग ग्रुप'च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करण्यात आली. निसर्गाच्या सान्निध्यात महाराजांना अभिवादन करत या ग्रुपने सामाजिक एकोपा आणि आरोग्याचा संदेश दिला.

**ज्येष्ठ शिवसैनिकाचा सन्मान :**

या खास प्रसंगी विंचूर येथील ज्येष्ठ शिवसैनिक बाळासाहेब चव्हाण यांचा ग्रुपच्या वतीने दत्ताभाऊ सोमवंशी यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. शिवरायांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव केल्याने उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

**निसर्गाच्या सान्निध्यात सोहळा :**

विंचूर येथील अनेक तरुण दररोज सकाळी व्यायामासाठी विंचूर एम आयडीसी परिसरात एकत्र येतात. या ग्रुपचे वैशिष्ट्य म्हणजे, ग्रुपमधील कोणत्याही सदस्याचा वाढदिवस असल्यास तो केक कापण्याऐवजी निसर्गाच्या सान्निध्यात, पाने आणि फुलांच्या सजावटीत पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केला जातो. हाच वारसा जपत शिवजयंतीचा सोहळाही अत्यंत मनमोहक वातावरणात पार पडला. या मॉर्निंग वाकचे मित्र किरण जेऊघाले, जयंत



साळी, भाऊसाहेब सोनवणे, डॉ शैलेश काळे, कांतीलाल नागरे, योगेश चव्हाण, विलास नेवगे, पांडुरंग काकड, प्रमोद वाकचौरे, मनोज शिरसाट, हरीश कांगणे, उत्तम शिरसाट, बाळासाहेब शिरसाट, शैलेश कचोळे, जितेंद्र सोमवंशी, संजय झाल्टे, राजेंद्र काळे व आदी मित्र यावेळी उपस्थित होते.

## बारमधील अश्लील नृत्यप्रकरणी गुन्हा, रेल्वे परिसरात १४ महिलांवर कारवाई...



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२१, कल्याण :** परिमंडळ ३ अंतर्गत पोलिसांनी मध्यरात्री बार व रेल्वे स्टेशन परिसरात कारवाई करत अनैतिक प्रकारांवर आळा घालण्याचा प्रयत्न केला. गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण परिसरातील रिगल बारमध्ये अश्लील नृत्य सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर एसीपी सुहास हेमाडे यांनी पथकासह तेथे अचानक भेट देत तपासणी केली. तपासणीदरम्यान बारमध्ये २३ मुली आढळून आल्याची प्राथमिक माहिती आहे.

या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाणे येथे गु.रजि. नं. १९९/२६ भा.न्या.सं. कलम २९६, २२३, ५४, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**रेल्वे स्टेशन परिसरात कारवाई:**

दरम्यान, कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी विशेष मोहीम राबवली. या कारवाईत ४ एजंट व १० पीडित महिलांवर कारवाई करण्यात आली.

सदर प्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे गुरजि. नं. १०७/२६ बीएनएस कलम १४३(३), ३(५) तसेच अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ च्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल

पोलिसांनी शहरातील बार व तत्सम आस्थापनांवर पुढील काळातही तपासणी मोहीम सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

# आनंद झावरे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्यातील दै.चालू वार्ता वृत्तपत्राच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी समाजरत्न २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथील हडपसर येथिल दैनिक चालू वार्ता कार्यालयासमोर हा सोहळा नुकताच मोठ्या उत्साह आणि शिस्तबद्ध नियोजनात संपन्न झाला.

यावेळी पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल मतिमंद मुलांची निवासी शैक्षणिक संस्थेचे मुख्याध्यापक आनंद रावसाहेब झावरे यांना समाजरत्न पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी दैनिक चालू वार्ता वृत्तपत्राचे मुख्य संपादक डि एस लोखंडे पाटील,जय मल्हार आर्थिक महामंडळ महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष तसेच जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष दौलत नाना शितोळे, दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष डॉ. भावार्थ देखणे महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस प्रशांत गांधी, स्वराज्य होम्सचे संचालक




सुनील शिंदे,संजय भोसले या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे तब्बल सत्तर पुरस्कार्थी उपस्थित होते.

आनंद झावरे यांनी आपल्या अथक परिश्रम, अपार प्रेम आणि समाजाभिमुख दृष्टीकोनातून विशेष गरज असलेल्या मुलांच्या जीवनात आशेचा प्रकाश निर्माण केला आहे. संस्थेतील मतिमंद मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक विकास घडवून आणला. विशेष मुलांबाबत समाजात असलेल्या गैरसमजुती दूर करण्यासाठी त्यांनी समाजजागृतीचे कामही हाती घेतले. पालकांमध्ये विश्वास निर्माण केला. आनंद झावरे यांच्या प्रयत्नांमुळे अनेक पालकांना आपल्या मुलांच्या भविष्या संदर्भात नवी आशा मिळाली. शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नसून जीवन जगण्याची कला आहे. हा विचार त्यांनी आपल्या कार्यातून प्रत्यक्षात उतरवला. आनंद झावरे यांचे कार्य केवळ शाळेपुरते मर्यादित नाही ,तर ते एक व्यापक सामाजिक चळवळ आहे. त्यांनी स्वतःचा वेळ, श्रम आणि मन पूर्णपणे या कार्यासाठी अर्पण केले. त्यांच्या कार्याची दखल घेत दैनिक चालू वार्ता समाजरत्न पुरस्कार २०२५ पुरस्काराने गौरविण्यात आले.

पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार निलेश लंके, ग्रामीण अपंग कल्याण केंद्राचे संचालक रावसाहेब झावरे, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब खिलारी, टाकळी ढोकेश्वर आदर्श गाव योजनेचे महेश पाटील, भाऊसाहेब झावरे सर, माजी सरपंच सुनीता झावरे, आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान, खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, पत्रकार वसंत रांधवण, टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांसह परिसरात अभिनंदन होत आहे.

# ५ पिक-अप सह ४६ गोवंशांची सुटका ; ५०.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, गोंडपिपरी (चंद्रपुर) :** गोंडपिंपरी तालुक्यात पोलिसांनी गोवंश तस्करांविरुद्ध मोठी कारवाई करत ५ पिक-अप वाहने जप्त केली असून ४६ गोवंशीय गायी व बैलांची सुटका केली आहे. एकूण ५० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.



आज दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मौजा वढोली येथे नाकाबंदी करण्यात आली. गडचिरोली येथून तेलंगणा राज्यात कत्तलीसाठी गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सकाळी सुमारे ६.३० वाजता संशयित पिक-अप वाहने दिसताच पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा इशारा केला. समोरील वाहन थांबवून चालक व सहप्रवाशाची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे मोहसीन अयुब खान (वय ४०, रा. वाकडी, जि. आसिफाबाद, तेलंगणा) व मोहम्मद मंजूर अली (वय ४२, रा. माजीदवाडा, ता. वाकडी, जि. आसिफाबाद, तेलंगणा) अशी सांगितली. दरम्यान, मागील चार वाहनचालकांनी पोलिसांना पाहताच पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग केला असता वडोली नदीच्या पुलाजवळ वाहने सोडून आरोपी शेतशिवारात पसार झाले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या ५ पिक-अप वाहनांमधून ९ लाख २० हजार रुपये किमतीचे ४६ गोवंशीय जनावरे तसेच ४१ लाख रुपये किमतीची ५ वाहने असा एकूण ५० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी (मुल) सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रमेश हत्तीगोटे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास महाराष्ट्र गोसेवा आयोगाचा पुरस्कार

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२१, राहुरी :** परळी वैजनाथ येथे पार पडलेल्या महा पशुधन एक्सपो या प्रदर्शनात कृषी महाविद्यालय पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने शुद्ध देशी गोवंश सन्मान योजना पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.



महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने देशी गोवंश जतन, संवर्धन, संशोधन, प्रशिक्षण व शेतकरी मार्गदर्शन या क्षेत्रात सातत्याने केलेल्या विशेष योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी सुनील सूर्यवंशी व नेरकर हे गोसेवा आयोगाचे सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते.

देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने व सह-शास्त्रज्ञ डॉ. सुजित भालेराव यांनी पुरस्कार स्वीकारला. पुरस्काराबद्दल महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संचालक, विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे, संचालक, संशोधन डॉ. प्रशांत बोडके, पुणे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने तसेच प्राध्यापक, शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी, गोपालक व शेतकरी यांचे कडून अभिनंदन करण्यात येत आहे.